# “इंगा-अस्साही”!!

© अनुजा बर्वे.

नातवंडांच्या फर्माईशीनुसार हेमलतेनं कोकम सार केलं. त्यावर तूप-जिरयाची फोडणी करावी म्हणून गॅसवर पळी तापवत ठेवतांना तिचं सहज घड्याळाकडे लक्ष गेलं.

“साडेबारा होतायत आत्ताशी ! लेक नि सुनेचा लंच ब्रेक साधारण १ च्या सुमारास होतो, म्हणजे सगळा स्वैपाक अगदी वेळेत तयार झाला म्हणायचा.” असा एक स्वत:चा स्वत:शीच संवाद  झाला तिचा.

‘चुर्रर्रss !’ फोडणीच्या आवजाने नात नि नातवाची जोडगोळी धावत आलीच कीचनमध्ये !

“आज्जी, किती मस्त वास आला गं!! ऑल डन ??” नातवाचा अधीर प्रश्न .

दोघांनाही भूक लागलेलीच असणार कडकडून ह्याचा अंदाज होताच हेमलतेला.

“तुम्ही दोघं जेवायला सुरूवात करता का? पाठोपाठ आई-बाबा जॉईन होतीलच! चालेल?”

“ No way आज्जी !!  सगळे एकदम जेवूया. ॲण्ड तू पण आमच्याबरोबरच हं !! मागाहून जेवते वगैरे नाही हं म्हणायचं “

आधीच गोबरे असलेले गाल आणखी फुगवत नातीनं जाहीर केलं. तिच्या छबीकडे बघून नि तिचं बोलणं ऐकून हेमलतेला ‘आभाळ ठेंगणं असल्यागत’ झालं.

“आज्जी, अत्ता आबा पण इथे आले असते तर किती मजा आली असती नं !! I know, त्याना सुध्दा रवा-कोकोनट खीर खूप आवडते नं ! ते मिस करणार आजचा मेन्यु”

मोठ्ठे मोठ्ठे डोळे करत नातवाचीही प्रतिक्रिया आली.

‘लॉकडाऊन’ नव्याने सुरू झालेल्या नि घराबाहेरच्या रोग ग्रस्ततेच्या काहिशा भीतीदायक वातावरणात हे असे संवाद म्हणजे हेमलतेला पर्वणीच होती.

ह्या अशा संवादाना मुकणं म्हणजे  खरंतर नातवंडांचे आबा- माधवराव , मोठ्ठा आनंद
गमावून बसलेयत असं मनात येऊन हेमलतेचा जीव चुटपुटला.
पण.....
माधवरावांना वाटायला हवं नं तसं?
 फक्त ‘स्व-विश्वात’च रमणारया माधवरावांच्या लेखी किंमत होती ती फक्त पैशाला नि स्वत:च्या मर्जीनुसार जगण्याला. आपली मतं इतरांवर लादण्यात धन्यता मानणारया माधवरावांच्या लेखी, अन्य इमोशनल आनंद अगदीच नगण्य असत. मुलात मूल होऊन खेळणं, नातवंडांना गोष्टी साभिनय सांगणं हे सगळं अगदी क्वचितच केव्हातरी घडे .म्हणजे ss त्यांच्या ‘Me -वेळापत्रका’त बाधा येणार नसेल तेव्हाच कदाचित.

इतक्या आत्मकेंद्री माणसाबरोबरचा सह प्रवास जिकिरीचाच होता खरंतर !
हेमलतेच्या मनात आठवणींची दाटी होऊन गेली.

हेमलतेच्या विचारांची तंद्री मोडली ती तिच्या लेकाच्या-उदयच्या प्रश्नाने !

" आईऽऽ, ए आई !! अगं कुठे हरवलेयस ? जेवायचं नं ??"

"अरे हो -हो !! सग्गळं तैयार आहे. मी टेबलही अरेंज करून ठेवलंय"
बोलता बोलता हेमलतेनं  एकीकडे वाढायला सुरूवात केली.

"आई, ह्या 'बंद' च्या निघालेल्या  फतव्यानंतर दोनेक दिवस निभावलं असेल अण्णांनी ! पण हळुहळु कडक होत जाणारया निर्बंधांमध्ये ते कसं मॅनेज करतायत ? तुझं बोलणं झालं का काही ?"

 डायनिंग टेबलवर सगळे एकत्र बसून जेवत असताना उदयनं हेमलतेला विचारलं.

"नाही ! बोलणं नाही झालंय अण्णांशी ! पण आपण दोघं संध्याकाळी तुझं काम संपल्यावर बोलू ! हा विषय आत्ता जेवताना नकोच.  अरे, तुमची दोन्ही लेकरं ,अखंड वेळ घरातघरात अन् तुमच्या 'वर्क फ्रा ॅम होम' सिट्यूएशन मुळे जरा गांगरून गेलेयत  नाही म्हटलं तरी ! आई-बाबांच्या 'ब्रेक-टाईम' ची वाट पहात होती केव्हांची, तेव्हा आता निवांत जेवणं होऊन्देत"

गेल्या आठवड्यात, मुलांची शाळा बंद होणं नि ऑफिसमधून 'वर्क फ्रॉम होम'चा फतवा निघणं हे काहिसं अचानकच घडलं. परिस्थितीचा एकंदर अंदाज येईपर्यंत चारेक दिवस लागतील कदाचित् म्हणून आई लगेच येऊन पोचली होती घरी. अण्णाही आले असते तर ..?  उदयच्या मनात आलेच हे विचार.
पण ....

त्यांचं 'रूटीन'मोडून ते येणं' तसं अपेक्षित नव्हतंच ! कुणाचं 'मन मोडलं' तरी पर्वा नव्हती अण्णांना त्यांच्यात्यांच्या दिनक्रमापुढे ! तरिही,...
अकल्पितपणे जाहीर झालेल्या ह्या 'लॉकडाऊन' नंतरचा 'अण्णां'च्या प्रतीचा आईचा 'शांतपणा' जरासा बुचकळ्यात टाकत होता उदयला.
परंतु लंचनंतर लगेचच ऑनलाईन मिटिंग असल्याने त्याने विषय तिथेच थांबवला.

हसत-खेळत जेवणं पार पडली. लेक आणि सूनबाई पुन्हा आपापल्या कामाला लागली.

'वीसेक मिनिटात गेम खेळायला येते' असं नातवंडांना प्रॉमिस करून हेमलता झाकपाक करायला कीचनमध्ये शिरली. काम करता करता त्यावेळचे संवाद आठवले हेमलतेला.
उदयची 'गरज' लक्षात घेऊन तातडीने स्वतःच्या घरातनं निघून इथे उपनगरातल्या त्याच्या घरी  येताना हेमलतेनं माधवरावांना आपल्याबरोबर येण्याबाबात कळकळीनं सांगून पाहिलं होतं.

"त्यांच्या जबाबदारया त्यांना हॅण्डल करू देत. उदय नि सूनबाई सक्षम आहेत. तू 'मदती'चा हात दिल्यासारखं करून उगाच त्यांच्या घरात ढवळाढवळ करू नको, काय समजलीस "

'मुलगा आणि सूनेला सक्षम ठरवून , स्वत:चा दिनक्रम कसा अबाधित राहील' हा माधवरावांच्या बोलण्यामागच्या हेतू ओळखून त्यांना समजवण्याकरता हेमलतेचं प्रत्युत्तर गेलंच -

"अहो, त्यांच्या क्षमतांबद्दल माझ्या मनात जराही शंका नाही . परंतु सध्याच्या परिस्थितीत, आपल्या माणसाचा विचार आपण नाही करायचा तर कुणी ? निदान त्या दोन नातवंडांचा तरी विचार करा. आई-बाबा कामात नि ती छोटी दोघं २४ तास घरात ! त्यांचा कंटाळा दूर करता करता आपल्यालाही बालपण गवसेल. एकदा असाही विचार करून बघा तरी "
पण.....
'पालथ्या धड्यावर पाणी !'

माधवरावांचा 'नकार' मान्य करावाच लागला हेमलतेला. परंतु..
'आपल्या माणसांना गरज असेल तेव्हा आपणच मदत करायला हवी' ह्या विचाराने , स्वत:च्या जाण्याबाबत 'ठाम' राहिली हेमलता!!

'मी, मला, माझं रूटीन' अशा आत्मकेंद्री स्वभावाच्या जोडीदारा बरोबर इतकी वर्ष आपण कशी रेटली ह्याचं नवलच वाटत असे हेमलतेला आताशा. सकाळपासून तीनेक वेळा तरी तिचा मोबाईल 'व्हायब्रेट' झाला होता.

'इंदुबाई केर-लादी-भांडी घासायला येईनाशा झाल्यात' माधवरावांचा पहिला मेसेज.

'पोळी-भाजी करायला आता येऊ शकत नाही, असा नयनाचा फोन आला होता आज सकाळी'-
मेसेज दुसरा.

'दूध आणि ब्रेड आता उद्यापासून नाही आणून देता येणार , असं वॉचमन सांगून गेलाय'-
तिसरा मेसेज.

'पैसा फेकला की सग्गळं काही मिळतं नि सग्गळी कामं होतात' अशी मग्रुरी होती माधवरावांच्या स्वभावात ! सतत ऑर्डरी सोडून कामं करून घेणं अंगात मुरलेल्या माधवरावांना ही 'घरबंदी' अगदी 'जायबंदी' करणारी ठरणारे ह्याची पूर्ण खात्री वाटत होती हेमलतेला.

पण म्हणूनच ....

'अनपेक्षित आणि जुळवून घ्यायला कठीण अशा ह्या लॉकडाऊन च्या घोषणेने ' हेमलता मात्र किंचित सुखावली होती.

'चांगली अद्दल घडायला हवीय ह्यांना कधीतरी एकदा ह्या स्वभावाबद्दल' अशी सुप्त इच्छा हेमलतेच्या मनात होतीच. मनाच्या तळाशी 'बंद' असलेल्या ह्या 'इच्छापूर्तीची शक्यता' सध्याच्या 'लॉकडाऊन'च्या काळात वाढलेली दिसत होती जणू हेमलतेला .

'खरं म्हणजे 'कृतज्ञता' हवीच माणसाकडे आणि नुसती असून उपयोगाची नाही तर ती ज्या त्या व्यक्तीपर्यंत वेळेनुसार ह्या ना त्या प्रकारे पोचायलाही हवी' अशा मताची हेमलता. नाती जपली जातात ती छोट्या-मोठ्या कृतीतून असं तिला वाटे. पण तिनं परोपरीनं सांगूनही हे रिअलायझेशन काही होत नव्हतं माधवरावांना !

प्राप्त परिस्थितीचा 'संधी' म्हणून वापर करायचं ठरवून हेमलतेनं सगळ्या मेसेजेसना मिळून एकच 'खवचट' उत्तर लिहायला घेतलं.

'मॉर्निंग वॉकला जाता येत नाहिये, मित्रमंडळींबरोबरच्या दुपारच्या पत्त्यांच्या खेळातही मोडता येतोय, हे सहन करणं अंमळ कठीणच जात असेल तुम्हाला. परंतु 'डबल पैशाची ऑफर देऊन इंदुबाई, नयना, वॉचमन ह्यांच्याकडून काम करून घ्या की! त्यात काय कठीणै? पैसा फेकला की सग्गळी कामं होतील. काऽऽय??'

मेसेज सेण्ड करून होतोय तोवर नातवंडांची हाक आलीच.

माधवराव आणि 'स्वावलंबन' ह्यांचं खूपच कमी सख्य असल्याने ह्यानंतर एकही दिवस ते एकट्याने निभावू शकणार नाहीत असं हेमलतेला पक्कं वाटत होतं. मनावर ताबा ठेवत हेमलता नातवंडांच्या खोलीत शिरली.

उदयचं काम संपलं संध्याकाळी अन् आईशी बोलायला म्हणून रूम बाहेर येतोय तोवर लॅण्डलाईन खणखणली.

"हॅलो,हं बोला अण्णा ! 'तुम्हाला इथे यायचंय म्हणता' तो मेसेज मी जस्ट वाचला तुमचा !! हो हो, माझं आजचं काम आत्ताच संपलंय. उद्या सकाळपर्यंत नक्की काही तरी करता येईल. प्राप्त परिस्थितीत तुम्हाला इथे आणण्याची व्यवस्था कशी करता येईल तेच पहात होतो.........."

उदयने , नेमकं तेव्हाच नातवंडांच्या खोलीतून उत्साहात बाहेर पडणारया हेमलतेला पाहिलं आणि फोन स्पिकरवर टाकला.

"माझा वयोगट बघता मी एकटा तुझ्याकडे यायला निघालो तर मला नक्की अडवतील. प्लिऽऽज, कसंही नि काहीतरी करून मला तुझ्याकडे न्यायची व्यवस्था कर रे बाबा"

पलिकडून माधवरावांच्या तोंडचं 'प्लिऽऽज' ऐकतांना आणि 'रिअलायझेशनच्या पट्टी' तला माधवरावांचा सूर ऐकतांना हेमलतेला विलक्षण अस "सुप्त समाधान" मिळालं.

हेमलता झर्रकन् कीचनकडे वळली.

'इप्सित' साध्य झाल्याच्या आनंदात काही क्षण 'एकटं' रहाता येईल म्हणून !!!